# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

## (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

### मेट्रो ट्रेन प्रवासी संख्येत वाढ

### सलग ४ दिवस प्रवासी संख्या ९० हजारच्या पार



नागपूर: नवीन शैक्षणिक सत्र सुरू तसेच मेट्रोच्या वेळापत्रका मध्ये करण्यात आलेल्या बदलामुळे नागरिकांचा कौल हा मेट्रो रेल सेवा कडे होत असल्याचे निदर्शनास आले आहे.त्यासोबतच नागपूर महानगर पालिकेच्या फिडर बस सेवा रॅशनलाईज केल्यामुळे प्रवासी संख्या मध्ये वाढ होत आहे. सलग ४ थ्या दिवशी नागपूर

मेट्रो रेल प्रकल्पाची प्रवासी संख्या हि ९० हजार पेक्षा जास्ती होती. याव्यतिरिक्त व्हॉट्सऍप तिकीट उपलब्ध झाल्यामुळे तिकीट काउंटर वरून तिकीट खरेदी न करता थेट व्हॉट्सऍपच्या माध्यमाने तिकीट खरेदी करण्यास प्रवासी प्राधान्य देत असल्याचे निदर्शनास आले आहे. नागपूर मेट्रोने मेट्रो ट्रेनच्या वेळापत्रकामध्ये बदल करत मेट्रो सेवा दर 10 मिनिटांनी उपलब्ध करण्यात आल्या होत्या त्याचाच फायदा नागपूर मेट्रोच्या प्रवासी संख्येमध्ये झाल्याच्या निदर्शनास आले आहेत.

- २९ जुलै (सोमवार) - प्रवासी संख्या ९३९४०
- ३० जुलै (मंगळवार) - प्रवासी संख्या ९२६८७
- ३१ जुलै (बुधवार) - प्रवासी संख्या ९००५६
- ०१ ऑगस्ट (गुरुवार) - प्रवासी संख्या ९३७९०
- ०२ ऑगस्ट (शुक्रवार) - प्रवासी संख्या ८८७९१( ७ वाजता पर्यंत)

उल्लेखनीय आहे कि, नागपूर मेट्रोने प्रवासी तिकीट संरचना केली होती ज्यामध्ये मेट्रो ट्रेनच्या भाड्यात 33% पर्यंत कपात करण्यात आली होती तसेच, विद्यार्थ्यांना महाकार्डवर मिळणाऱ्या 30% डिस्काउंट शिवाय नव्या संरचनेनुसार शालेय आणि महाविद्यालयातील विद्यार्थीकरता हे भाडे जवळपास 50% पर्यत कमी झाले आहे. त्यासोबतच मेट्रो ट्रेनमध्ये (कुठलेही अतिरिक्त भाडे न घेता) सायकल सोबत घेऊन जाण्याची परवानगी देते.

महा मेट्रोने नुकतेच व्हॉट्सऍप तिकीट सेवा सुरू केली आहे, ज्यामुळे तिकीट खरेदीसाठी रांगेत उभे राहण्याची गरज नाहीशी झाली आहे.महा मेट्रोने प्रवाश्याना तिकीट खरेदी करिता खालील अनेक पर्याय उपलब्ध करून दिलेआहेत.ज्यामध्ये;तिकीट काउंटर, तिकीट व्हेंडिंग मशीन, तिकीट बुकिंग ऍप, महाकार्ड(10% डिस्काउंट),विद्यार्थी महा कार्ड (30 % डिस्काउंट) समावेश आहे.

नागपूर मेट्रोच्या खापरी,ऑटोमोटिव्ह चौक, प्रजापती नगर आणि लोकमान्य नगर मेट्रो स्टेशन या चारही टर्मिनल स्टेशनवरून मेट्रो सेवा सकाळी 8 ते रात्री 8 वाजता दरम्यान दर 10 मिनिटांनी उपलब्ध करण्यात आल्या आहेत. ज्याचा फ़ायदा शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच कार्यालयीन कर्मचारी, व्यापारी आणि व्यावसायिक वर्गाला देखील होत आहे.